# प्रकरण पाच

## सारांश निष्कर्ष व सूचना

## प्रकरण पाच

## सारांश निष्कर्ष व सूचना

मागील प्रकरणात संशोधनासाठी निश्चित केलेली साधने मतावली व प्रश्नावली या साधनांच्या आधारे संकलित झालेल्या संशोधन समस्याविषयीच्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणात त्यापुढील टप्पा म्हणजे केलेल्या अर्थनिर्वचनाला अंतिम स्वरूप देणे अर्थात संशोधनाचे निष्कर्ष होय. या प्रकरणात मतावली व प्रश्नावली या संशोधन साधनाद्वारे प्राप्त निष्कर्ष मांडले आहेत. तसेच संशोधनावरून पूरक शिफारशी सुचविल्या आहेत. तसेच पुढील संशोधनाकरिता संशोधन विषय दिलेले आहेत.

आज अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य याचबरोबर शिक्षण ही मूलभूत गरज मानली जाते. शिक्षणााचा विविध पैलूंनी व बाजूंनी विचार केला जातो. वैयक्तिक दृष्टया शिक्षण ह सर्वांगीण विकासाचे सभोवतालच्या परिस्थितीशी सूसमायोजन साधण्याचे माध्यम मानले जाते. शिक्षण हे सामाजिक दृष्टया समाज परिवर्तनाचे साधन तर आर्थिक दृष्टया ती देशाच्या विकासासाठी केली जाणारी गुंतवणूक समजली जाते. 'राष्ट्राचे भवितव्य हे वर्गा—वर्गातून घडत असते'. असे कोठारी आयोगाचे समर्पक विधन आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

शिक्षणाचा बराचसा भाग हा अनौपचारिक शिक्षणाने व्यापलेला आहे. औपचारीक शिक्षणात शिक्षकाला अनन्य साधारण महत्व आहे. आज शिक्षकाच्या भूमिका, कार्ये याबाबतच्या अपेक्षा विस्तारत आहेत. अध्यापनाच्या बाबतीत आज शिक्षकापुढे नवनवीन आव्हाने येत आहेत. विद्यार्थ्यांमधील व्यक्तिभेद ज्ञानेंद्रियाच्या कार्य क्षमतेचा पूरेपूर वापर करून घेणे. विद्यार्थी संस्था, गुणवत्तापूर्ण शिक्षण इत्यादी अनेकविध अव्हानांची शिक्षकाला निट जाणीव असणे गरजेचे ठरत आहे. या अव्हानांवर मात करण्यासाठी त्याने सक्षमही असले पाहिजे. या सक्षमीकरणाचा

पाया हा शिक्षकाच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये अधिक पक्का होत असतो. शिक्षक—शिक्षण कार्यक्रमांतर्गत शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून विद्यार्थी—शिक्षक घडत असतो. आजचा विद्यार्थी शिक्षक हा उदयाचा शिक्षक म्हणून कार्य करणारा असतो. आज तो ज्या पध्दतीने ज्ञान व कौशल्य आत्मसात करतो त्या अनुषंगाने तो उद्या शिक्षक या नात्याने ते अध्यापन करतो. शिक्षक—शिक्षण कार्यक्रमातील सैध्दांतिक व प्रात्याक्षिक घटकामधून विद्यार्थी—शिक्षकांमध्ये गुणात्मक इष्ट स्वरूपाचा बदल व्हावा हा प्रमुख हेतु असतो. विद्यार्थी—शिक्षकाचे अध्ययन—अध्यापन आनंददायी व प्रभावी होण्यासाठी विषयाचे सखोल व समग्र ज्ञान हवे, तसेच त्या विषयामध्ये सामाविष्ठ असणा—या अनेकविध संकल्पनात्मक बाबींचे समृध्द ज्ञान हवे. अध्यापन कराव्या लागणा—या घटकानुरूप म्हणजेच आशयानूरूप अध्यापन पध्दती, तंत्रे व अनुदेशनात्मक साहित्याचे माध्यम या सर्व बाबीचे नियोजन कसे करावे याचे सुध्दा ज्ञान महत्वाचे ठरते.

"One can not be rigid in the use of teaching methods. All teaching methods are effective in certain stuations and bot so effective in other situation canten: and objectives determine the method to be used".

असे भालवणकर अे. जी. (१९८५) हे आपल्या पीएच. डी शोधप्रबंधात अध्यापन पध्दतीबाबत नमूद करतात. म्हणजेच सर्व अध्यापन पध्दती या काही विशिष्ट परिस्थितीमध्ये प्रभावी ठरत नाहीत. आशय आणि उद्‌दिष्टे ही कोणती अध्यापन पध्दती उपयोगात आणावयाची हे निश्चित करतात म्हणून एक आणि एकच अध्यापन पध्दतीला चिटकून राहता कामा नये. एकूणच आपला आशय व उद्‌दिष्टे तसेच अध्ययन कर्त्यांचे स्वरूप लक्षात घेऊन अध्यापनाची कार्यनिती ठरविली तरच अध्ययन कर्त्यांची गुणवत्ता आपणास साध्य करता येईल. भूगोल विषयाच्या अध्यापनामध्ये हा मुलभूत दृष्टीकोन बाळगला तरच प्रभावी अध्यापनाची शैली आत्मसात करता येईल.

## संशोधनाचा सारांश

**समस्या विधान** (Statement of Problem)

बी.ए. बी.एड्. (एकात्मिक) विद्यार्थी-शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोल घटकांवर आधारीत आशय समृद्धी संचाचे विकसन- एक अभ्यास.

**समस्या विधानातील पारिभाषिक संज्ञांच्या व्याख्या** (Defination of the term Used)

संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा या हेतूने संशोधन समस्या विधानामध्ये वापरलेल्या संज्ञा व पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

### बी.ए.बी.एड्. विद्यार्थी-शिक्षक

**संकल्पनात्मक व्याख्या**

माध्यमिक स्तरासाठी शिक्षक घडविणारी शिक्षणशास्त्र पदवी बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) हा शासनमान्य असा अभ्यासक्रम आहे. प्रस्तुत अभ्यासक्रम चार वर्षाचा असून सदरचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर माध्यमिक स्तरावर शिक्षक म्हणून नोकरीत रूजू होता येते.

**कार्यात्मक व्याख्या**

माध्यमिक स्तरासाठी शिक्षक घडविणारी शिक्षणशास्त्र पदवी बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) हा शासनमान्य असा अभ्यासक्रम आहे. प्रस्तुत अभ्यासक्रम चार वर्षाचा असून सदरचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर माध्यमिक स्तरावर शिक्षक म्हणून नोकरीत रूजू होता येते.

(Four years B.A.B.Ed. student - teacher in B.A.B.Ed. integrated course of Mahaveir Mahavidyalaya, Kolhapur. Affiliated under Shivaji University, Kolhapur in Maharashtra for the academic year 2012 to 2014.)

### भूगोल

**संकल्पनात्मक व्याख्या**

"भौतिक परिस्थितीचा मानवी जीवनावर जो परिणाम होतो त्याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे भूगोल होय." - रॅटझेल, फ्रेड्रिक (शिंदे, डी.बी. आणि पाटील बी. एम. २००५, पान नं. ३)

**कार्यात्मक व्याख्या**

मराठी माध्यमाच्या शालेय अभ्यासक्रमात सामाजिक शास्त्रे या विषयांतर्गत समाविष्ट करण्यात आलेला एक विषय म्हणजे भूगोल या अर्थाने सदरच्या संज्ञेचा विचार प्रस्तुत संशोधन विषयासाठी केला आहे.

**उच्च प्राथमिक स्तर**

**संकल्पनात्मक व्याख्या**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (१९८६) दिलेल्या आकृतीबंधानुसार (५+३+२+२+३) इयत्ता सहावी, सातवी, आठवी या वर्गाचा अंतर्भाव असणारा स्तर म्हणजे उच्च प्राथमिक स्तर होय. —शिक्षण संक्रमण, ऑगस्ट २००८

**कार्यात्मक व्याख्या**

प्रस्तुत संशोधनामध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी या स्तरावर असणाऱ्या भूगोल पाठ्यपुस्तकातील मानवी भूगोल घटकावर आशय समृद्धी संचासंदर्भात उच्च प्राथमिक स्तराचा विचार केला आहे.

**मानवी भूगोल**

**संकल्पनात्मक व्याख्या**

अस्वस्थ मानव व अस्थिर पृथ्वी यांच्यातील बदलत्या संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानवी भूगोल होय. मिस सेंपल, (खतीब के. ए., १९९७)

**कार्यात्मक व्याख्या**

प्रस्तुत संशोधनात मानवी भूगोल घटकांवर आधारीत बी.ए.बी.एड्. विद्यार्थी-शिक्षकांसाठी आशय समृद्धी संच विकसना संदर्भात आशय समाविष्ट केला आहे.

**घटक**

**संकल्पनात्मक व्याख्या**

उद्दिष्ट्ये साध्य होण्याच्या दृष्टिने पाठ्यक्रमातील एकजिनसी व सलग भागांची जुळणी म्हणजे 'घटक' होय. (शिंदे, डी. बी. आणि पाटील, बी. एम. २००५, पान नं. १४८)

**कार्यात्मक व्याख्या**

उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील पाठ्यपुस्तकातील मानवी भूगोलासंदर्भात एकजिनसी व समान गुणधर्माचे भाग एकत्र आणून तयार केलेली प्रकरणे (धडे किंवा पाठ) म्हणजे घटक या अर्थाने सदरच्या संज्ञेचा प्रस्तुत संशोधनात विचार केलेला आहे.

**आशय समृद्धी संच**

**कार्यात्मक व्याख्या**

आशय समृद्धी संच असा की, ज्यामध्ये महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी प्रकाशित केलेली अनुक्रमे इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतची मराठी माध्यमातील भूगोल विषयाच्या पाठ्यपुस्तकातील मानवी भूगोलाच्या संदर्भात असणाऱ्या सर्व आशय घटकावर लिखित (मुद्रित) स्वरूपाची सखोल माहिती व संकल्पनासंदर्भात व्याख्या, तत्वे, नियम, वैशिष्ट्ये, छायाचित्रे, आकृत्या,

नकाशे एकत्र करून दृक–मुद्रित स्वरूपाचा संच म्हणजे आशय समृद्धी संच असा अर्थ प्रस्तुत संशोधनात अभिप्रेत आहे.

**विकसन**

**संकल्पनात्मक व्याख्या**

Development is the act or process of developing unfolding a graduak growth or advancement through progressive changes. - New Webster Dictionary, (2007)

**कार्यात्मक व्याख्या**

बी.ए.बी.एड् (एकात्मिक) विद्यार्थी-शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोल घटकांवर आधारीत आशय समृध्दी संचाची निर्मिती व त्याची परिणामकारकता तपासणे म्हणजे विकसन होय.

**अभ्यास**

**संकल्पनात्मक व्याख्या**

Study means an investigation of the perticular subject or the published findings of such an investigation. - (Good, C. V. (1973)

**कार्यात्मक व्याख्या**

बी.ए.बी.एड्. च्या विद्यार्थी-शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोल घटकांवर आधारीत आशय समृद्धी संचाची परिणामकारकता पडताळण्यासाठी जमा केलेल्या माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण, अर्थनिर्वचन व निष्कर्ष काढणे म्हणजे अभ्यास होय.

**संशोधनाची उद्दिष्टे** (Objectives of Study)

१) उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता सहावी ते आठवी) भूगोल विषयाच्या क्रमिक पाठयपुस्तकातील मानवी भूगोलाच्या घटकातील संकल्पनांचा शोध घेणे.

२) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता सहावी ते आठवी) मानवी भूगोलाच्या घटकातील संकल्पनांवर आधारित आशय समृध्दी संचाचे विकसन करणे.

३) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता सहावी ते आठवी) मानवी भूगोलाच्या घटकातील संकल्पनांवर आधारित संशोधक निर्मित आशय समृद्धी संच तज्ञांकडून तपासून घेणे.

४) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांसाठी विकसित केलेल्या आशय समद्धी संचाची परिणामकारकता तपासणे.

**संशोधनाचे गृहितके** (Assumpsions)

१) बी.ए.बी.एड्. चे विद्यार्थी-शिक्षक उच्च प्राथमिक स्तरातील इयत्तांवर सराव पाठ घेतात.

२) आशय समृद्धी संचाच्या सहाय्याने अध्ययन परिणामकारक होते.

३) मानवी भूगोल या घटकावर आधारीत आशय समृद्धी संचाचे विकसन करता येते.

४) बी.ए.बी.एड्. च्या विद्यार्थी-शिक्षकांना मानवी भूगोलातील संकल्पना, नियम, तत्त्वे समजण्यास अडचणी येतात.

**संशोधन परिकल्पना** (Hypothesis)

आशय समृद्धी संचाच्या वापरामुळे बी. ए. बी. एड्. विद्यार्थी-शिक्षकांच्या मानवी भूगोलाच्या आशय ज्ञान संपादनात वाढ होते.

**संशोधनाची गरज** (Need of the study)

प्रस्तुत संशोधनाची गरज पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी येणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकांना, ज्यांची प्रथम व द्वितीय अध्यापन पद्धती भूगोल आहे. त्यांना सरावपाठापूर्वी मानवी भूगोलातील संबोध, संज्ञा, संकल्पना, नियम व तत्त्वे स्पष्टतेसाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

२) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) छात्राध्यापकांना भूगोलाच्या सरावपाठापूर्वी संदर्भ साहित्य म्हणून या आशय समृध्दी संचाचा उपयोग होतो. तसेच त्यांच्या भौगोलिक ज्ञानाचे दृढीकरणासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

३) प्रस्तुत संशोधनापूर्वी अशा प्रकारचे मानवी भूगोलाच्या आशयावर आशय समृध्दी संचासंदर्भात संशोधन झाले नसल्याने आणि तेही बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) शिक्षणशास्त्र पदवी स्तरावर असे संशोधन झाले नसल्याने या संशोधनाची विशेष गरज आहे.

४) विशिष्ट प्रकारचा स्वयं अध्ययन संच म्हणून उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी या आशय समृद्धी संचाचे उपयोजन करणार असल्याने त्याची गरज आहे.

५) परिपूर्ण व ज्ञानी भूगोल शिक्षक निर्मितीसाठी बी.ए.बी.एड्. व बी.एड् पदवी स्तरावर या संशोधनाची गरज आहे.

६) भूगोल अध्ययन अध्यापन प्रक्रिया गतिमान, प्रभावी, परिणामकारक व सहेतूक होण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

८) बी.ए.बी.एड. (एकात्मिक) व बी.एड. (एक वर्षीय) भूगोल अध्यापन पद्धतीच्या विद्यार्थी

-शिक्षकांना सराव पाठातील पाठ टाचणातील मानवी भूगोलाचे पाठ्यांश पृथ:करणासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

## संशोधनाचे महत्त्व (Significance of the Study)

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.बी.ए.बी.एड्चे विद्यार्थी-शिक्षक हे भावी पिढीचे शिक्षक आहेत. अशा शिक्षकांच्या हाती देशाचे भवितव्य म्हणजेच विद्यार्थी भगोल विषयाचे ज्ञान घेणार आहेत. असा शिक्षक भूगोल विषयात परिपूर्ण असणे आवश्यक आहे. जर प्रशिक्षण काळात त्यांच्या मानवी भूगोलातील संकल्पना, नियम, तत्वे, स्पष्ट नसतील तर त्याचा परिणाम त्यांच्या हाती शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यावर होणार आहे. म्हणून या संशोधनास विशेष महत्व आहे.
प्रस्तुत संशोधनापूर्वी अशा प्रकारचे मानवी भूगोलाच्या आशयावर आशय समृध्दी संचासंदर्भात संशोधन झाले नसल्याने आणि तेही बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) शिक्षणशास्त्र पदवी स्तरावर असे संशोधन झाले नसल्याने या संशोधनास विशेष महत्त्व आहे. विशिष्ट प्रकारचा स्वयं अध्ययन संच म्हणून उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी या आशय समृद्धी संचाचे उपयोजन करणार असल्याने त्यास विशेष महत्त्व आहे. बी.ए.बी.एड्. चे आणि बी.एड्. पदवीस अध्यापन व सरावासाठी मार्गदर्शन करणाऱ्या भूगोलाचे शिक्षण प्रशिक्षणार्थींना हे संशोधन महत्त्वाचे आहे. बी.ए.बी.एड. (एकात्मिक) व बी.एड. (एक वर्षीय) भूगोल अध्यापन पद्धतीच्या विद्यार्थी-शिक्षकांना सराव पाठातील पाठ टाचणातील मानवी भूगोलाचे पाठ्यांश पृथ:करणासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

## संशोधनाची व्याप्ती (Scope of the study)

प्रस्तुत संशोधनाअंती विकसित केला जाणारा आशय समृद्धी संच :

१) महाराष्ट्रातील सर्व मराठी माध्यमाच्या बीए. बी. एड. (एकात्मिक) शिक्षणशास्त्रातील पदवी घेणाऱ्या ज्यांची प्रथम व द्वितीय अध्ययन पद्धती भूगोल असणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकांना उपयोगी आहे.

२) भूगोल अध्यापक व शिक्षक आणि अध्यापक शिक्षण पदवीका (D.T.Ed.) शिक्षणशास्त्र पदवी (B.Ed.) घेणाऱ्या छात्राध्यापकांना व उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना उपयोगी आहे.

**संशोधनाच्या परिमर्यादा**

१) प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील बी.ए.बी.एड् (एकात्मिक) ही शिक्षणशास्त्राची पदवी घेणाऱ्या मराठी माध्यमाच्या ज्यांची प्रथम व द्वितीय अध्यापन पद्धती भूगोल आहे अशा विद्यार्थ्यांसाठी मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधनाच्या आशय समृद्धी संचाची परिणामकारकता तपासणी व संचासंदर्भात तज्ज्ञ म्हणून बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) पदवीस अध्यापन करणारे भूगोल अध्यापन पद्धतीचे शिक्षक प्रशिक्षक असतील.

३) प्रस्तुत संशोधनातील आशय समृद्धी संच उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोलाच्या घटकांवर आधारीत आहे..

४) प्रस्तुत संशोधनातील आशय समृद्धी संचाची परिणामकारकता तपासणीसाठी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात शिकणाऱ्या बी.ए.बी.एड्. (एकात्मिक विद्यार्थी-शिक्षकांचा समावेश केलेला आहे.

**प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड**

प्रस्तूत संशोधनासाठी नमुना निवड खालील तीन टप्प्यात करण्यात आली .

**टप्पा १ ः-**


उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल पाठ्यपुस्तकाचे संरचनेनूसार विश्लेषण, आशय समृध्दी संच विकसन यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

**टप्पा २ ः-**

मानवी भूगोल आशय समृद्धी संचाची तपासणीसाठी १० भूगोल तज्ज्ञाची (भूगोल विषय तज्ज्ञ ५ व भूगोल अध्यापन पध्दती ५) निवड असंभाव्यता नमूना निवड पद्धतीतील सहेतूक पद्धतीने केली आहे.

**आकृती क्र. ९ प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड टप्पा १ व २**

टप्पा ३ ः-




**आकृती क्र. १० प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड टप्पा ३**

बी. ए. बी. एड् .भाग २ ते ४ या वर्गातील एकूण ३० विद्यार्थी शिक्षकांची निवड लॉटरी पध्दतीने केली.

**प्रस्तूत संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलित करण्यासाठी संशोधकाने पुढील साधनांचा वापरकेला.

**सारणी क्र. ३९ संशोधनाची साधने**

| अ.क्र. | उद्दिष्टे | साधन | प्रतिसादक | साधनाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| १. | आशय समृद्धी संच तज्ञांकडून तपासून घेणे. | मतावली | भूगोल विषय तज्ज्ञ | संशोधक निर्मित |
| २. | आशय समद्धी संचाची परिणामकारकता तपासणे. | प्रश्नावली | विद्यार्थी शिक्षक. | संशोधक निर्मित |

**संशोधन कार्यपध्दती**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने मिश्र पध्दतीचा अवलंब केला यामध्ये सर्वेक्षन आणि प्रयोगिक संशोधन पध्दतीचा अवलंब केला.

१. संशोधकाने प्रथम वी. ए. वी. एड् (एकात्मिक) विद्यार्थी शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल पाठयपुस्तकातील मानवी भूगालाचे घटक-उपघटक निश्चित केले.

२. नंतर उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल पाठयपूस्तकातील मानवी भूगोल घटकातील उपघटकानूसार भौगोलिक संकल्पनांची निवड केली. तज्ज्ञांशी चर्चा करून संकल्पनांची पूनरावृत्ती टाळली.

३. प्राप्त मानवी भूगोलातील संकल्पनांच्या व्याख्या, स्पष्टिकरण, उदाहरणे, छायाचित्रे, आकृत्या, पूरक माहिती व अध्ययन-अध्यापन विषयक महिती संदर्भ ग्रंथातून आणि संकेतस्थळाारून सर्वेक्षण करून मिळविली, तज्ज्ञांशी चर्चा करून योग्य व तार्किक स्वरूपात मानवी भूगोल आशय समृध्दी संचाचे लेखन व मंडणी केली.

४. आशय समृध्दी संच मूल्यमापनासाठी तज्ञांकरीता मताावली व वी. ए. वी.एड्. विद्यार्थी शिक्षकांसाठी संचाची पारिणामकारकता तपासण्यासाठी प्रश्नावली (पूर्वोत्तर संपादन चाचणी) विकसित केली.

५. प्रश्नावली तज्ज्ञांकडून तपासून घेऊन त्यांनी सुचविलेल्या सुचनाव्दारे आवश्यक बदल प्रश्नावलीमध्ये करून तयार झालेल्या प्रश्नावलीचा पथदर्शी अभ्यास घेतला.

६. त्यानंतर मताावली आवश्यक ते बदल करून मताावली व्दारे आशय समृध्दी संचावावत तज्ज्ञांची मते जाणण्यासाठी माहितीचे संकलन करण्यात आले.

७. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून त्यावर आधारित आशय समृध्दी संचात तज्ज्ञांनी सूचविल्याप्रमाणे सूधारणा करण्यात आल्या.

८. आशय समृध्दी संचाच्या निर्मितीनंतर सशोधकाने त्यांची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रायोगिक संशोधन पध्दतीचा अवलंब केला.

९. यामध्ये एकलगट अभिकल्पाची निवड करण्यात आली.

१०. महावीर महाविद्यालय कोल्हापूर मधील बी.ए.बी. एड् च्या भूगोल प्रथम व द्वितीय अध्यापन पध्दती असणा-या ३० विद्यार्थी शिक्षकांची सहेतुक पध्दतीने निवड करण्यात आली.

११. गटाला पुर्वचाचणी देवून आशय समृध्दी संच वापरण्यास, अध्ययनास दिला.

१२. नंतर एक महिन्यानंतर उत्तर चाचणी घेण्यात आली.

१३. संकलित माहितीचे खालिल संख्याशास्त्रीय परिमाने, तंत्रे वपरून विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

**संख्याशास्त्रीय परिमाने** (Statistical tools & technique used)

संख्याशास्त्रामध्ये पुढील काही प्रमुख संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर केला जातो

**अ. वर्णनात्मक सांख्यिकी**

| | | |
|---|---|---|
| १. मध्यमान | २. बहुलक | ३. विस्तार |
| ४. चतुर्थक विचलन | ५. मध्य विचलन | ६. सहसंबध गुणक |

**ब. अनुमानात्मक सांख्यिकी**

| | | |
|---|---|---|
| १. टी–परिक्षिका | २. $X^2$ परिक्षिका | ३. F परिक्षिका |

## उद्दिष्टानुसार संशोधनाचे निष्कर्ष

**उद्दिष्ट क .** १) उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता सहावी ते आठवी) भूगोल विषयाच्या क्रमिक पाठयपुस्तकातील मानवी भूगोलाच्या घटकातील संकल्पनांचा शोध घेणे.

**निष्कर्ष**

उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता सहावी ते आठवी) भूगोल विषयाच्या क्रमिक पाठयपुस्तकातील मानवी भूगोलाच्या घटकातील शोधलेल्या १६५ संकल्पना (आर्थीक भूगोल १२० आणि सामाजिक व सांस्कृतिक भूगोल ४५) पुढीलप्रमाणे आहेत.

### उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोल घटकातील उपशाखानिहाय संकल्पना

अ. आर्थिक भूगोल आंतरविद्याशाखीय व सर्व उपशाखीय संकल्पना (मानवी व्यवसाय किंवा प्रमुख आर्थिक क्रिया)

**प्राथमिक व्यवसाय**

१.शिकार
२.वनसंकलन
३.पशुपाालन
४.शेती
५.खाणकाम
६.मासेमारी
७.लाकुडतोड

**द्वितीयक व्यवसाय**

१.ग्रामोद्योग
२.कुटीर \लघुउद्योग
३.कारखाानदारी

**तृतीयक व्यवसाय**

१.व्यापार
२.वाहतुक
३.दळणवळण

**चतूर्थक व्यवसाय**

१.विशेष सेवा
२.डॉक्टर
३.वकील
४.शिक्षक

### सारणी क्र.४०

उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील आर्थिक भूगोल घटकातील उपशाखानिहाय संकल्पना

| साधनसंपत्ती भूगोल | कृषी भूगोल | औदयोगिक भूगोल | वाहतुक व दळणवळण भूगोल | व्यापारी भूगोल | पर्यटन व पर्यावरण भूगोल |
|---|---|---|---|---|---|
| १. साधनसंपत्ती | १.शेती\कृषी | १.उद्योग/ | १.वाहतूक | १.व्यापार | १.पर्यटन |
| २.मानवनिर्मित | २.सखोल शेती | उद्योगधंदा | वाहतूक प्रकार | २.राष्ट्रीय | २.पयटनाचे |
| साधनसंपत्ती | ३.विस्तृत शेती | २.उद्योग | २.भूमार्ग/ | व्यापार | घटक |
| ३. निसर्गनिर्मित | ४.व्यापारी धान्य | धंद्याचे | जमिनीवरी | ३.अंतररा- | ३.पर्यटक |
| साधनसंपत्ती | शेती | स्थानिकिकरण | वाहतूक | ष्ट्रीय व्यापार | ४.मरूद्याने |
| ४.खनिजसंपत्ती | ५.मळयाची शेती | ३.कच्चा माल | ३.रस्तेमार्ग | ४.संतूलित | ५.पर्यावरण |
| ५.मृदासंपत्ती | ६.मृदा | ४.उर्जा साधने | वाहतूक | व्यापार | ६.नैसर्गिक |
| ६.जलसंपत्ती | ७.लॅटेराईट मृदा | ५.कुशल व मर्य | ४.लोहमार्ग | ५.प्रतिकुल | पर्यावरण |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७.वनसंपत्ती<br>८.प्राणी संपत्ती<br>९.पानझडी वने<br>१०.ससहरित वने<br>११.जंगलतोड<br>१२.निर्वनिकरण<br>१३.पूनर्वनीकरण<br>१४.आर्द्र पानझडी जंगले<br>१५.शुष्क पानझडी जंगले<br>१६.उष्ण कटिवंधिय काटेरी जंगले<br>१७.हिमालयिन जंगले<br>१८.दक्षिणेकडील डोंगरी जंगले<br>१९.प्राणी संपत्ती<br>२०.पाळीव प्राणी संपत्ती<br>२१. उदरनिर्वाहक पशुपालन<br>२२.व्यापारी पशुपालन<br>२३.दुग्धोत्पादक पशुपालन<br>२४.मेषपालन व लोकर उत्पादन<br>२५.जलसाधन संपत्ती | ८.उष्ण कटिवंधिय तांवडी मृदा<br>९.पिंगट मृदा<br>१०.प्रेअरी मृदा<br>११.पॉडझॉल मृदा<br>१२.चर्नोझम\ काळी मृदा<br><br>भारतातील मृदा प्रकार<br>१३.पर्वतीय मृदा<br>१४.गाळाची मृदा<br>१५.तांवडी मृदा<br>१६.काळी\ रेगूर मृदा<br>१७.लॅटेराईट मृदा<br>१८.वाळवंटी मृदा<br>१९.मृदेची धूप<br>२०.मृदा अवनती\मृदा विनश<br>२१.मृदेची उत्पादकता<br>२२.जलसिंचन | क्षम मजूर<br>६.वाजारपेठ<br>७.भांडवल<br>८.शासकिय धोरण<br>९.उद्योग धंद्याच्या एकत्रिकरणाचे अर्थशास्त्र<br>१०.उद्योग धंद्याचे केंद्रीकरण<br>११.वस्त्रोद्योग<br>१२.सूती कापड उद्योग<br>१३.सूती कापड उद्योगाचे स्थानिकिकरण<br>१४.लोहपोलाद उद्योग<br>१५.वेवर यांचा औद्योगिक स्थानिकिकरणाचा सिध्दांत | वाहतूक<br>५.खनिजतेल व नैसर्गिक वायू नळ वाहतूक<br>६.जलवाहतूक / जलमार्ग<br>७.अंतर्गत जलवाहतूक<br>८.सागरी जलवहतूक<br>९.हवाई /विमान वाहतूक<br>१०.संदेशवहन / संज्ञापन | व्यापार<br>६.अनुकुल व्यापार<br>७.व्दिपक्षीय व्यापार<br>८.दृश्य व्यापार<br>९.अदृश्य व्यापार | ७.सांस्कृतिक पर्यावरण<br>८.पर्यावरण प्रदुपण<br>९.प्रदूषक<br>१०.हवा प्रदुपण<br>११.जल प्रदुपण<br>१२.ध्वनि प्रदुपण |

## सारणी क्र.४१

## ब)उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील सामाजिक व सांस्कृतिक भूगोल घटकातील उपशाखानिहाय संकल्पना

| लोकसंख्या भूगोल | वसाहत भूगोल | राजकिय भूगोल | ऐतिहासिक भूगोल | वैद्यकिय भूगोल | लष्करी भूगोल |
|---|---|---|---|---|---|
| १.लोकसंख्या | १.वस्ती/ वसाहत | | | | |
| २.लोकसंख्या भूगोल | २.वस्ती भूगोल | | | | |
| ३.लोकसंख्येची रचना | ३.मानवी वस्ती | | | | |
| ४.वयोगटानूसार लोकसंख्या रचना | ४.अस्थायी वस्त्या | | | | |
| ५.लिंगानूसार लोकसंख्या रचना | ५.स्थायी वस्ती | | | | |
| ६.लिंग गुणोत्तर | ६.ग्रामीण वस्ती | | | | |
| ७.जन्म मृत्यू प्रमाणानूसार लोकसंख्या रचना | ७.विखुरलेल्या वसाहती | | | | |
| ८.जन्मदर ९.मृत्यूदर | ८.केंद्रीत वसाहती | | | | |
| १०.भृणहत्या | ९.विखंडीत वसाहती | | | | |
| ११.ग्रामीण-शहरी प्रमाणानूसार लोकसंख्या प्रमाण | १०.संयुक्त वसाहती | | | | |
| १२.ग्रामीण लोकसंख्या | | | | | |
| १३.शहरी लोकसंख्या | ११.शहरी वसाहत | | | | |
| १४.व्यवसायानूसार लोकसंख्या | १२.नागरी वाडी | | | | |
| १५.लोकसंख्येची गुणवत्ता | १३.नागरी खेडे | | | | |
| १६.साक्षरता | १४.शहर | | | | |
| १७.सूसंस्कृत समाज | १६.महानगर | | | | |
| १८.प्रगतशील समाज | १७.सन्नगर | | | | |
| १९.आरोग्य | १८.महाकाय नगर | | | | |
| २०.शैक्षणिक पातळी | १९.शहरीकरण | | | | |
| २१.तांत्रिक शिक्षण | | | | | |
| २२.उच्च शिक्षण | | | | | |
| २३.व्यवसायिक शिक्षण | | | | | |
| २४.लोकसंख्या वाढ | | | | | |
| २५.लोकसंख्या वाढीचा आलेख | | | | | |

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**उद्दिष्ट क .२)** वी.ए.वी.एड्.(एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता सहावी ते आठवी) मानवी भूगोलाच्या घटकातील संकल्पनांवर आधारित आशय समृध्दी संचाचे विकसन करणे.

**निष्कर्ष**

सदर उद्दिष्ट प्रक्रियात्मक (Procedural Objective) असून याचे निष्कर्ष प्रकरण क्रमांक चार मध्ये (विकसित आशय समृध्दी संच) दिले आहेत.

**उद्दिष्ट क . ३ )** वी.ए.वी.एड्.(एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता सहावी ते आठवी) मानवी भूगोलाच्या घटकातील संकल्पनांवर आधारित संशोधक निर्मित आशय समृद्धी संच तज्ञांकडून तपासून घेणे.

**निष्कर्ष**

१. आशय समृध्दी संचातील आशय समृध्दी ही अतिशय चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त (६०%) आहे.

२. आशय समृध्दी संचातील आशय गुणवता ही चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

३. आशय समृध्दी संचातील संकल्पना स्पष्टता ही चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

४. आशय समृध्दी संचातील आशय विश्वसनियता ही चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

५. आशय समृध्दी संचातील उदाहरणांचा वपर अतिशय चांगला आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

६. आशय समृध्दी संचातील पूरक माहिती ही चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

७. आशय समृध्दी संचात आकृत्या व छायाचित्रांचा वापर अतिशय चांगला आहे असे सर्वच तज्ज्ञांचे मत आहे.

८. आशय समृध्दी संचातील भाषा ही अतिशय चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

९. आशय समृध्दी संचाची अध्यापना वावतची उपयुक्तता ही चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

१०. आशय समृध्दी संचाची पाठ नियोजनासाठी उपयुक्तता अतिशय चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

११. आशय समृध्दी संचाची स्वयं अध्ययनासाठी उपयुक्तता अतिशय चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

१२. आशय समृध्दी संचाची परीक्षेसाठी उपयुक्तता ही चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

१३. आशय समृध्दी संचातील अध्यापन शैलीची गुणवत्ता ही चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

१४. आशय समृध्दी संचाची मुद्रण आणि वांधणी ही अतिशय चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

१५. आशय समृध्दी संचाचे प्रथम पृष्ठ व इतर वावी या अतिशय चांगल्या आहते असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

१६. आशय समृध्दी संचाची एकत्रित गुणवत्ता ही अतिशय चांगली व चांगली आहे असे म्हणणा-या तज्ज्ञांचे प्रमाण समान आहे.

१८. अ) संचातील शब्द मांडणी, आकृत्या, छायाचित्रे, उदाहरणे, यामूळे हा संच मानवी भूगोलाचा अभ्यास करणा-या सर्वांना उत्कृष्ठ मार्गदर्शक ठरेल.

ब) संचातील सर्व आशय चांगल्या प्रकारे सुनियोजितरित्या मांडला आहे

क) संचाचे लेखन उत्तम व सुत्रवध्दपणे केले आहे.

ड) बी.ए.बी.एड् व डी.टी.एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या काठिण्य पातळीस उपयुक्त असा मानवी भूगोलाचा आशय समृध्द झाला आहे.

इ) बी.ए.बी.एड् (एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांसाठी हा एक संशोधकाचा स्तूत्य प्रयत्न आहे.

**उद्दिष्ट क.** ४) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांसाठी विकसित केलेल्या आशय समद्धी संचाची परिणामकारकता तपासणे.

## निष्कर्ष

मानवी भूगोल आशय समृद्धी संचाच्या वापरामुळे बी.ए.बी.एड्. विद्यार्थी-शिक्षकांच्या भौगोलिक (मानवी भूगोलाच्या आशय ज्ञान) संपादनात वाढ होते.

## अनुमान

१. बी.ए.बी.एड् (एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांना उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोलाच्या संकल्पना, संबोध, नियम, तत्वे, उदाहरणे, आकृत्या, छायाचित्रे, इत्यादीच्या ज्ञान व अकलनासाठी मानवी भूगोल आशय समृध्दी संच उपयुक्त ठरतो.

२. बी.ए.बी.एड् (एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांसाठी उच्च प्राथ्ठमिक स्तरावरील भूगोल पाठयपुस्तकातील मानवी भूगोलाच्या आशय आकलनासाठी आशय समृध्दो संच महत्वाची भूमिका बजावतो.

३. बी.ए.बी.एड् (एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांना भूगोल अद्यापान पध्दतीचे पाठ नियोजन करताना पाठयांश पृथःकरण, शैक्षणिक साधन निवड, अध्यापन पध्दती निवड,अध्यापन प्रयुक्त्या, तंत्रे, सूत्रे, गाभा घटक , जीवन कौशल्ये, इ. ची निवड करताना मानवी भूगोल आशय समृध्दी संच उपयुक्त ठरतो.

**निष्कर्षांची चर्चा**

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष व अनुमान यांची संशोधनाची उद्दिष्टे,. व्याप्ती आणि मर्यादा या संदर्भात चर्चा करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त निष्कर्षांच्या सार्थ आकलनास मदत होईल. प्रस्तूत संशोधनात बी.ए. बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मनवी भूगोल घटकावर आधारित आशय समृध्दी संच विकसित केला. यामध्ये प्रथम उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल पाठयपूस्तकाचे संरचनेनूसार विश्लेषण केले.पाठयक्रमाचा एकात्मिक तक्ता तयार केला. त्यानंतर आशय समृध्दी संचासाठी आवश्यक माहिती संकलन करून त्याची पध्दतशीर मांडणी केली. निर्मित संच भूगोल विषय तज्ज्ञाकडून तपासून घेऊन नंतर त्याची परिणामकारकता तपासण्यात आली.

**पोंक्षे, द. बा.** (१९८५). यांनी पूणे विद्यापीठात पी.एच.डी. पदवीसाठी केलेल्या संशोधनाचे प्रथम उद्दीष्ट हे इयत्ता सातवी, आठवी, नववीच्या भूगोल पाठयक्रमातील संकल्पनांचे विश्लेषण व यादी करणे असे होते. प्रस्तूत संशोधनातही आशय समृध्दी संचाचे विकसन करताना उच्च प्राथमिक स्तरावरील (इ.६वी.७वी.व ८वी) भूगोल विषयातील मानवी भूगोल घटकातील संकल्पनांचे विश्लेषण व यादी केलेली आहे.

**पटेल, एन.डी.** (१९९८).यांनी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यासाठी गणित अध्यापनासाठी स्वयं अध्ययन साहित्य पारंपारीक पध्दतीपेक्षा परीणामकारक आहे असे दिसून आले होते. प्रस्तुत संशोधनातही आशय समृध्दी संचाचा वापर परिणामकारक ठरलेला आहे.

खरात, सु. सु. (२000). यांनी केलेल्या संशोधनात **बी.एड्. विद्यार्थी शिक्षकांसाठी शैक्षणिक तंत्रज्ञान विषयासाठी विकसित मार्गदर्शन संचाची परिणामकारकता** प्रभावी ठरलेली आहे.

प्रस्तुत संशोधनातही आशय समृध्दी संचाचा वापर बी. ए. बी. एड् विद्यार्थी शिक्षकांसाठी परिणामकारक ठरलेला आहे.

**इंगळे, एस. एम.** (२००५). यांनी विद्यार्थी शिक्षकांसाठी अर्थशास्त्र अध्यापन संचाच्या वापरामुळे विद्यार्थी शिक्षकांच्या अर्थशास्त्रीय संकल्पना अधिक स्पष्ट झालेल्या दिसून आल्या. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्षही याचप्रकारे सकारात्मक आलेले आहेत.

**इनामदार, ई.अ. (२००६).** यांनी पीएच.डी. साठी 'विद्यार्थी शिक्षकांसाठी प्रकृतीक भूगोलाच्या आशय समृध्दी संचाचे विकसन एक अभ्यास ' या विषयावर संशोधन केले. या संचाच्या वापरामूळे बी. एड्. विद्यार्थी शिक्षकांच्या संपादनात वृध्दी होते, प्राकृतिक भूगोलच्या संकल्पना स्पष्ट होतात आणि आशय समृध्दी संच वापरण्यास संदर्भग्रंथापेक्षा सुटसुटीत वाटतो. असे निष्कर्ष प्राप्त झाले होते. तशाच प्रकारचे निष्कर्ष प्रस्तुत संशोधनातून प्राप्त झाले आहेत.

**निर्मळे, नि. चं. (डिसेंबर २०१२).** यांनी पीएच .डी. साठी **उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना भूगोल विषयातील संकल्पना व तत्वांचे अर्थपूर्ण अध्ययन होण्यासाठी शिक्षक मर्गदर्शक संचाचे विकसन - एक अभ्यास** या विषयावर संशोधन केले. या शिक्षक मार्गदर्शक संचाच्या वापरामूळे उच्च प्राथमिक स्तरावरील विद्याार्थ्यांच्या संपादनात वृध्दी होते, भूगोलच्या संकल्पना व तत्वे स्पष्ट होतात आणि आशय समृध्दी संच वापरण्यास संदर्भग्रंथापेक्षा सुटसुटीत वाटतो. असे निष्कर्ष प्राप्त झाले होते. तशाच प्रकारचे निष्कर्ष प्रस्तुत संशोधनातून प्राप्त झाले आहेत.

वरील सर्व विवेचन व चर्चेवरून असे दिसून येते की, प्रस्तुत संशोधनातून प्राप्त निष्कर्ष हे नक्कीच उपयुक्त ठरतील.त्यांचा शिक्षणशास्त्राचे अभ्यासक, विद्यार्थी शिक्षक, अध्यापक, भूगोल विषय तज्ज्ञ, विद्यार्थी आणि समाज या सर्वांना नक्कीच फायदा होईल.

### शिफारशी

#### विद्यार्थी शिक्षकांसाठी शिफारशी

१. विद्यार्थी शिक्षकांनी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोल घटकांवर प्राविण्य मिळविण्यासाठी मानवी भूगोल आशय समृध्दी संचाचे अध्ययन करावे.

२. बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) उच्च प्रथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोल उपघटकांचे अध्ययन व अध्यापन करण्यासाठी, पाठ नियोजन करताना मानवी भूगोल आशय समृध्दी संचाचा वापर करावा.

३. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांनी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयाचे घटक नियोजन व पाठ नियोजन करताना मानवी भूगोल आशय समृध्दी संचाचे अध्ययन करावे वा आधार घ्यावा.

४. बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) विद्यार्थी शिक्षकांनी मानवी भूगोल घटकांच्या सराव पाठ नियोजन करताना पाठयांश पृथःकरण, अध्यापन पध्दती, अध्यापन तंत्रे, प्रयुक्त्या, गाभा घटक, जीवन कौशल्ये, उदाहरणे, इत्यादींचा अवलंब करताना मानवी भूगोल आशय समृध्दी संचाचा वापर करावा.

५. विशिष्ट प्रकारचा स्वयं अध्ययन संच म्हणून उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांनी प्रस्तुत आशय समृध्दी संचाचे उपयोजन करावे.

**शिक्षक, शिक्षकप्रशिक्षक आणि अध्यापकांसाठी शिफारशी**

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील पदविका व पदवी स्तरावरील भूगोल अध्यापक, भूगोल अध्यापन पध्दती मार्गदर्शक व सराव पाठाच्या मार्गदर्शकांनी मानवी भूगोल घटक वा उपघटकाचे मार्गदर्शन करताना प्रस्तुत मानवी भूगोल आशय समृध्दी संचाचा आधार घेऊन मार्ग दर्शन करावे. तसेच विद्यार्थी शिक्षकांना मानवी भूगोल आशय समृध्दी संचाचा आधार घेण्यास सुचवावे.

**शाळा व महाविद्यालयांसठी शिफारशी**

१. ज्या माध्यमिक शाळेत वा प्रशालेत उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता आहेत त्यांनी विद्यार्थ्यांच्या मानवी भूगोलातील आशय प्राविण्यासाठी प्रस्तुत मानवी भूगोल आशय समृध्दी संच उपलब्ध करून द्यावा.

२. बी. ए. बी. एड्. (एकात्मिक), बी. एड्. पदवी आणि डी.टी. एड् पदविका महाविद्यालयांनी भूगोल प्रथम व व्दितीय अध्यापन पध्दती असणा-या विद्यार्थी शिक्षकांना पाठ नियोजन करण्यासाठी प्रस्तुत मानवी भूगोल आशय समृध्दी संच उपलब्ध करून द्यावा.

### शासनासाठी शिफारस

१. मानवी भूगोल हा विषय उपयोजित असल्याने शासनाने मानवी भूगोल आशय समृध्दी संच विकसनासाठी व मुद्रणासाठी शाळा व महाविद्यालयांना अनुदान द्यावे किंवा मोफत प्रकाशन करून द्यावे.

### पुढील संशोधनासाठी विषय

१. बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) विद्यार्थी-शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोल घटकावर आधारित बहुमाध्यम संचाचे विकसन -एक अभ्यास
२. बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) विद्यार्थी-शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील भरताचा भूगोल घटकावर आधारित आशय समृध्दी संचाचे विकसन - एक अभ्यास
३. बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) विद्यार्थी-शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल अध्यापनासाठी मार्गदर्शन संचाचे विकसन - एक अभ्यास

### समारोप

सदर प्रकरणात सारांश, परिकल्पनांची पडताळणी, संशोधन साधनावरून आलेले निष्कर्ष, उद्दिष्टानुसार संशोधनाचे निष्कर्ष, शिफारशी आणि पुढील संशोधनासाठी विषय इ. बाबींचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात करण्यात आलेला आहे.